Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University
Chhatrapati Sambhajinagar-431004
Maharashtra (India)
**NAAC Re-accredited A+ Grade**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
छत्रपती संभाजीनगर-४३१००४.
महाराष्ट्र (भारत)
नॅक समितीतर्फे अ+ दर्जा प्राप्त

Telephone
Office PBX : (0240) 2403399/400
Director : (0240) 2403201
Office : (0240) 2403178 / 199
Website : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac.
E-Mail : coe@bamu.ac.in

**Office : Director, Board of Examination & Evaluation**
**कार्यालय : संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

संदर्भ क्र. परीक्षा/पप्र/६७ वा दीक्षांत समारंभ./२०२६/1569 दिनांक : १६.०९.२०२६

# ६७ वा दीक्षांत समारंभ – परिपत्रक

## (उपस्थितीत व अनुपस्थितीत पदव्यांचा अनुग्रह करण्यासाठी पदवी आवेदनपत्राबाबत)

या परिपत्रकान्वये सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते की, ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२५ आणि मार्च/एप्रिल, २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत उत्तीर्ण व पदवीस पात्र स्नातकांना त्या-त्या पदव्यांचा अनुग्रह करण्यासाठी **डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६७ वा दीक्षांत समारंभ शुक्रवार दिनांक २३ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ठिक ११.३० वाजता संपन्न होणार आहे.**

त्यास्तव पदवीस पात्र स्नातकांना उपस्थितीत व अनुपस्थितीत पदव्यांचा अनुग्रह करण्यासाठी पदवी आवेदनपत्र सादर करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

- करिता, ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२५ आणि मार्च/एप्रिल, २०२६ मध्ये उत्तीर्ण झालेल्या व त्या-त्या पदवी पात्र अशा स्नातकांनी पदवी आवेदनपत्र **दिनांक ११ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन विभागात व्यक्तिशः अथवा टपालाने प्राप्त होतील या बेताने पदवी आवेदपत्रासाठी लागणाऱ्या सर्व आवश्यक कागदपत्रासह सादर करावीत.

**पदवी आवेदनपत्राच्या शुल्कासंबंधीचे विवरण खालीलप्रमाणे आहे:**

| अ.क्र. | पदवीचा तपशिल | पदवी प्रमाणपत्रासाठीचे शुल्क रुपये | टपाल शुल्क (महाराष्ट्रातील रहिवाशी स्नातकांसाठी) | टपाल शुल्क (महाराष्ट्र राज्याबाहेरील रहिवाशी स्नातकांसाठी) |
|---|---|---|---|---|
| १. | पदव्युत्तर अभ्यासक्रमानंतरचे अभ्यासक्रम | ५००/- | ५०/- | १००/- |
| २. | पीएच.डी. अभ्यासक्रम | ६००/- | ५०/- | १००/- |

उपरोक्त प्रमाणे ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२५ आणि मार्च/एप्रिल, २०२६ मध्ये उत्तीर्ण झालेल्या व पदवीस पात्र स्नातकांनी पदवी आवेदनपत्र सादर करावीत असे या परिपत्रकाद्वारे आवाहन करण्यात येत आहे. आवेदनपत्राचा नमूना www.bamu.ac.in या संकेतस्थळावर Publication मध्ये उपलब्ध आहे.

महत्वाची सूचना :

- ज्या स्नातकांनी महाविद्यालयामार्फत ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२५ आणि मार्च/एप्रिल, २०२६ च्या परीक्षा आवेदनपत्रासोबत यापूर्वीच पदवी आवेदनपत्र व पदवी शुल्क सादर केलेले आहेत अशा स्नातकांनी पदवी आवेदनपत्राच्या शुल्काची पावतीची छायांकित साक्षांकित प्रत सादर करावीत.

**संचालक,**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

याची एक प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित :

१. मा. कुलगुरू यांचे सचिवालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

२. मा. प्र-कुलगुरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

३. मा. कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

४. मा. संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उप-परिसर, धाराशिव

५. सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

६. सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उप-परिसर, धाराशिव

७. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

८. वित्त व लेखाधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

९. संचालक, युनिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

१०. जनसंपर्क अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

११. सर्व उपकुलसचिव/सहाय्यक कुलसचिव, परीक्षा विभाग

प्रत :

१. सर्व कक्ष अधिकारी व कक्ष प्रमुख, परीक्षा विभाग